॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ९ :- साहित्यातून मानव कल्याणाची भावना विकसीत केली पाहिजे. साहित्य हे मानवाच्या विचारांची शाळा आहे, साहित्यातून मानव धडे घेत असतो असे प्रतिपादन माजी संचालक, केंद्रीय हिंदी प्रशिक्षण संस्था, गृह मंत्रालय, भारत सरकार, ज्येष्ठ साहित्यकार डॉ. जयप्रकाश कर्दम यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित पी. एम. उषा कार्यक्रमांतर्गत 'साहित्यातील मानवतावाद' या विषयावर एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे दि. ९ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता उद्घाटन करतांना केले.

यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, ज्येष्ठ पत्रकार व नाट्यकर्मी ज्ञानेश महाराव, भाषा अभ्यास, प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म. सु. पगारे, आजीवन अध्ययन विस्तारविभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील व समन्वयक डॉ. सुदर्शन भवरे उपस्थित होते.

डॉ. कर्दम पुढे म्हणाले की, समाजाने विभाजन,हिंसा, दबंगगिरी आदि बाबी पाहिल्या, साहित्याने मानवाला नेहमी मानवतावादाकडे नेण्यासाठी प्रेरीत केले. परंतु मानवावर त्याचा खरच प्रभाव पडला आहे का हे विचार करण्यासारखे आहे. मानवतावाद सर्वांना समानतेंची वागणूक देण्यास सांगतो त्याचे आचरण झाले पाहिजे.

ज्येष्ठ पत्रकार व नाट्यकर्मी ज्ञानेश महाराव यांनी जात-पात, धर्म, वंश,लिंग, या भेदात माणसाने अडकू नये. नितीमूल्ये हे मानवतावादाचे धर्म आहेत. आपल्या दैनंदिन जीवनात मानवतावादाचे आचरण केले पाहिजे. अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, भाषा कोणतीही असो प्रत्येक भाषेचे साहित्य हे मानवाला केंद्रस्थानी ठेवून लिहिले गेले आहे. सर्वसाहित्यात मानवकल्याणाचे विवेचन केले आहेत. संतांनी देखील पुरातन काळापासून मानवतावाद जोपासण्याचे काम केले. सुरुवातीस चर्चासत्राची भूमिका मांडतांना भाषा अभ्यास, प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांनी सांगितले की, या चर्चासत्रात साहित्यातील मानवतावाद या विषयावरील शोधनिबंधांचे मराठीतून खंड -१ व २, हिंदी भाषेतून खंड-१ व इंग्रजीभाषेतून खंड-१ व २ असे ५ खंड तयार करण्यात आले आहेत असे सांगून मानवतावादावर भाष्य करतांना त्यांनी सांगितले की, प्रत्येक माणसाने मानवतावाद जोपासला पाहिजे, मानवतावाद हा माणसांच्या जगण्याशी निगडीत आहे. मानवाचे वर्तन विवेकपूर्ण असावे. साहित्य हे माणसाला माणूस बनवणारे असावे, चांगली राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था घडविणारे असावे. या चर्चासत्रात २०० संशोधक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. सूत्रसंचलन खेमराज पाटील व कैलास पाटील यांनी केले तर आभार सूदर्शन भवरे यांनी मानले.

याप्रसंगी साहित्यातील मानवतावाद या विषयावरील शोधनिबंधांचे मराठीतून खंड -१ व २, हिंदी भाषेतून खंड-१ व इंग्रजीभाषेतून खंड-१ व २ असे ५ खंडाचे प्रकाशन मंचावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हे खंड निर्मिती करतांना भाषा अभ्यास प्रशाळेतील संचालक व शिक्षक यांनी परीश्रम घेतले.

उद्धटनानंतर बीजभाषण करतांना ज्येष्ठ पत्रकार व नाट्यकर्मी ज्ञानेश महाराव म्हणाले की, माणसाने माणसांचाच विचार केला पाहिजे आणि माणसासारखे वागले पाहिजे. साहित्याने समाजाला जोडून ठेवता येईल असे साहित्य निर्माण केले पाहिजे. महात्मा फुले, संत तुकाराम, प्रबोधनकार ठाकरे इ. राष्ट्र पुरुषांनी मानवतावादाचा प्रसार व प्रचार केला परंतु समाज व्यवस्थेत अजूनही मानवतावाद पूर्णत:दिसत नाही. जातीभेद, धर्मभेद, वंशभेद आदिबाबी ईश्वरनिर्मित नाहीत. तर या मानवनिर्मितच आहेत असे सांगून विविध उदाहरणे त्यांनी दिलीत व तरूणांनी मानवतावाद जोपासावा असे आवाहन केले.

चर्चासत्रात गोवा विद्यापीठाच्या मराठी अध्ययन शाखेचे संचालक डॉ. विनय मडगांवकर, छत्रपती संभाजीनगर येथील युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक डॉ. राहुल कोसंबी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक अभ्यास शाळाचे संचालक प्रा. दिलीप चव्हाण, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठावाडा विद्यापीठाचे माजी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. काशिनाथ रणवीर, सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी हिंदी विभाग प्रमुख प्रा. व्ही.एन.भालेराव यांची व्याख्याने झाली. या चर्चासत्रात मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांमध्ये स्वतंत्र संशोधन पेपर वाचन सत्रांचे आयोजन करण्यात आले. विविध विद्यापीठांतील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी साहित्यामधील मानवतावाद, मानवी मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि समकालीन साहित्य यावर आपले विचार मांडले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ९ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता